# अभंग - ज्ञानेश्वरी

## अध्याय पांचवा

अर्जुन उवाच–

संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ।
यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥१॥

मग तो किरीटी । श्रीहरीतें म्हणे । कैसें हो बोलणें । आपुलें हें ॥१॥
एक चि तें मज । सांगाल साचार । करूं ये विचार । तरी त्याचा ॥२॥
मागें सकल हि । कर्मांचा संन्यास । तुम्ही [१] बहुवस । सांगितला ॥३॥
तरी आतां केवीं । कर्मयोगीं भर । देत असां फार । पुन्हां येथें ॥४॥
आम्हां नेणत्यांसी । होई ना उकल । ऐसे [२] व्द्यर्थ बोल । बोलतसां ॥५॥
*एकतत्त्वबोध । करावा म्हणाल । तरी व्हावा बोल । एकनिष्ठ ॥६॥
तुम्हां सर्वज्ञातें । प्रभो चक्रपाणी । काय आणिकांनीं । सांगावें हें ॥७॥
आपणासारिख्या । थोरांसी विनंति । देखा केली होती । ह्या चि लागीं ॥८॥
कीं हा परमार्थ । [३] संदिग्ध भाषेंत । न बोलावा येथ । भगवंतें ॥९॥
परी तें मागील । असो आतां देवें । [४] प्रस्तुत सांगावें । उकलोनि ॥१०॥
दोहोंमाजीं मार्ग । कोणता बरवा । तो मज बोलावा । स्पष्टपणें ॥११॥
शेवटापर्यंत । सर्वथा निश्चित । करी जो सोबत । *साधकासी ॥१२॥
तेवीं चि जो होय । पूर्णत्वें सफळ । स्वभावें सरळ । आचराया ॥१३॥
निद्रेचें तें सुख । न मोडतां जेथें । वाटचाल होते । बहुसाळ ॥१४॥
ऐसें सुखासन । असावें वाहन । तैसें तें *साधन । व्हावें सोपें ॥१५॥

---

१ पुष्कळ प्रकारें. २ दोन अर्थ होणारे. ३ स्पष्ट अर्थ न कळणाऱ्या. ४ आतां.
*परिशिष्ट पहा.

ऐसे अर्जुनाचे । ऐकोनियां बोल । प्रेमें आला डोल । देवालागीं ॥१६॥
मग संतोषोनि । म्हणे ऐकें पार्था । पुरेल सर्वथा । [१] मनोरथ ॥१७॥
जया भाग्यवंता । कामधेनु माय । चंद्र तो हि होय । खेळ त्याचा ॥१८॥
* उपमन्यूलागीं । होवोनि प्रसन्न । देव दयाघन । सदाशिव ॥१९॥
देई * क्षीरोदधि । त्यासी दूधभाता । होय पुरविता । [२] भक्त-काम ॥२०॥
तैसें औदार्याचें । माहेर श्रीकृष्ण । अर्जुना-आधीन । जरी झाला ॥२१॥
तरी सर्व सुखां । आश्रयाची जागा । कां न व्हावा सांगा । कौन्तेय तो ॥२२॥
मानावें हो येथें । नवल तें काय । रमाकांत होय । स्वामी ज्याचा ॥२३॥
तेणें आतां इच्छे–। सारिखें मागावें । हें तों ओघा यावें । स्वभावें चि ॥२४॥
म्हणोनियां पार्थें । मागितलें तें तें । दिलें रमाकांतें । संतोषोनि ॥२५॥
तरी आतां तें चि । ऐका सावधान । सांगेन श्रीकृष्ण । काय बोले ॥२६॥

श्रीभगवानुवाच–
संन्यास: कर्मयोगश्च नि:श्रेयसकरावुभौ ।
तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥२॥

म्हणे [३] मोक्षप्रद । दोन्ही हि ते देख । संन्यास आणिक । कर्मयोग ॥२७॥
असे जरी ऐसें । अर्जुना साचार । [४] तत्त्वतां विचार । करूं जातां ॥२८॥
तरी जैसी [५] नाव । स्त्रियां-बाळकांतें । पैलतीरा नेते । जळांतून ॥२९॥
जाणत्यां-नेणत्यां । सकळांसी तैसा । सोपा सुबोधसा । कर्मयोग ॥३०॥
पार्था, सारासार । करितां विचार । सुलभ साचार । हा चि योग ॥३१॥
कर्मसंन्यासाचें । येणें योगें फळ । लाभतें सकळ । अनायासें ॥३२॥
आतां संन्यासी जो । तयाचें लक्षण । तुज निवेदीन । ह्या चि लागीं ॥३३॥
मग दोन्ही मार्ग । साच एकरूप । ऐसें आपोआप । जाणशील ॥३४॥

ज्ञेय: स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति ।
निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बन्धात्प्रमुच्यते ॥३॥

होवोनि जें गेलें । न घे त्याचें नांव । नाहीं जया हांव । कोणती हि ॥३५॥

---

१ मनांतील हेतू. २ भक्ताची इच्छा. ३ मोक्ष देणारे. ४ खरोखर; तत्त्वार्थानें. ५ होडी.

असे * मेरु जैसा । सर्वथा अढळ । तैसा जो निश्चळ । अंतर्यामीं ।।३६।।
*अहंता ममत्व । गळालीं संपूर्ण । संन्यासी तो जाण । निरंतर ।।३७।।
तयासी [१] आसक्ति । सोडोनियां जाय । मनें ऐसा होय । संन्यासी जो ।।३८।।
म्हणोनि जें साचें । सुख अखंडित । तें चि तया प्राप्त । अनायासें ।।३९।।
आतां [२] गृहादिक । लागे ना सोडावें । *निःसंग स्वभावें । मन झालें ।।४०।।
अगा, जैसी जातां । विझोनियां आग । राखुंडीचा ढीग । उरे जो का ।।४१।।
मग वस्त्रामाजीं । गुंडाळितां त्यास। न होई वस्त्रास। अग्नि-बाधा।।४२।।
शिवे चि ना तैसा । अल्प हि *संकल्प । जयाच्या [३] निर्लेप । बुद्धीलागीं ।।४३।।
उपाधिमाझारीं । असोनि तो पार्था । [४]नाकळे सर्वथा । कर्मबंधीं ।।४४।।
म्हणोनि समूळ । संकल्पाचा नाश । तेव्हां चि संन्यास । घडूं शके ।।४५।।
ह्याचिलागीं कर्म–। संन्यास आणिक । कर्म-योग देख । सारिखे च ।।४६।।

सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः ।
एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ।।४।।

नाहीं तरी सांख्य–। योग-व्यवस्था ती । केविं मंदमती । जाणती ते ।।४७।।
स्वभावें ते पार्था । होती मतिमंद । म्हणोनियां भेद । दिसे त्यांसी ।।४८।।
एऱ्हवीं प्रत्येक । दीपाप्रति पाहें । प्रकाश का आहे । भिन्न भिन्न ? ।।४९।।
ह्यापरी यथार्थ । घेवोनि प्रचीति । देखते जे होती । पूर्ण * तत्त्व ।।५०।।
सांख्य आणि योग । दोहोंचे हि ठायीं । ठेविती ते पाहीं । ऐक्यभाव ।।५१।।

यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।।
एकं सांख्यं च योगं च यःपश्यति स पश्यति ।।५।।

ज्ञानयोगें पार्था । होय जें का प्राप्त । तें चि लाभे येथ । कर्मयोगें ।।५२।।
ऐशा परी ऐक्य । स्वभावतां आहे । दोहोंसी हि पाहें । सव्यसाची ।।५३।।
देखें अवकाशा । आणिक आकाशा । भेद नाहीं जैसा । अणुमात्र ।।५४।।
तैसें चि एकत्व । योग-संन्यासाचें । जया आलें साचें । [५]प्रत्ययासी ।।५५।।
जेणें सांख्य योग । जाणिले अभिन्न । झालें आत्मज्ञान । तयासी च ।।५६।।

---

* परिशिष्ट पहा. १. संसाराची ओढ. २ घर इत्यादि. ३ शुद्ध. ४ व्यापला जात नाही. ५ अनुभवाला.

**तेणें चि गा जाण । आपुलें आपण । घेतलें दर्शन । यथार्थत्वें ।।५७।।**

संन्यासस्तु महाबाहो दु:खमाप्तुमयोगत: ।
योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ।।६।।

**कर्मयोगपंथ । [1] आक्रमोनि पार्था । चढे जो पर्वता । मोक्षरूप ।।५८।।**
**तो चि येथें ब्रह्म–। सुखाचें शिखर । गांठितो सत्वर । अनायासें ।।५९।।**
**परी अव्हेरूनि । निष्काम कर्मास । धरी जो [2] हव्यास । संन्यासाचा ।।६०।।**
**तयालागीं वायां । बापुडे सायास । घडे ना संन्यास । कदा काळीं ।।६१।।**

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेन्द्रिय: ।
सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ।।७।।

**आपुलें मानस । घेतलें हिरोनि । संमोहापासोनि । [3] जेणें पार्था ।।६२।।**
**मग गुरु-वाक्यें । करोनि निर्मळ । रोविलें केवळ । आत्मरूपीं ।।६३।।**
**जोंवरी पडे ना । सागरीं लवण । तोंवरी तें भिन्न । एकदेशी ।।६४।।**
**परी सिंधूमाजीं । तें चि पडे जेव्हां । होतसे तें तेव्हां । सिंधुरूप ।।६५।।**
**संकल्पापासोनि । तैसें चि काढिलें । ज्याचें मन झालें । ब्रह्मरूप ।।६६।।**
**असो एकदेशी । परी तेणें जाण । व्यापिलें संपूर्ण । लोकत्रय ।।६७।।**
**कर्ता-कर्म-कार्य । * त्रिपुटी ही ऐसी । खुंटली तयासी । आपोआप ।।६८।।**
**आणि सर्व कर्में । करी जरी आतां । तरी तो तत्त्वतां । अकर्ता चि ।।६९।।**

नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ।
पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गाच्छन्स्वपञ्श्वसन् ।।८।।
प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि ।
इंद्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ।।९।।

**तयाचिया ठायीं । स्वभावतां पाहीं । देहबुध्दि नाहीं । अल्पमात्र ।।७०।।**
**तरी कैचें काय । कर्तृत्व तें मग । तेथें उरे सांग । धनुर्धरा ।।७१।।**
**ऐसे ब्रह्म-गुण । [4] तनुत्यागाविण । दिसती संपूर्ण । तयाठायीं ।।७२।।**
**एऱ्हवीं आणिकां–। सारिखा चि देख । असे तो हि एक । देहधारी ।।७३।।**

---

१ चालून. २ सोस; न पेलणाऱ्या गोष्टीचा लोभ. ३ ज्यानें. ४ देह टाकल्याशिवाय.

आणि [१] यथाप्राप्त । सर्व हि व्यापार । करी तो साचार । दिसे ऐसें ॥७४॥
आणिकांसारिखा । तो हि नेत्रीं पाहे । तेविं ऐकताहे । कर्णद्वारा ॥७५॥
परी त्या व्यापारीं । सर्वथा तो नोहे । नवल हें पाहें । धनुर्धरा ॥७६॥
घ्राणेंद्रियद्वारा । घेई परिमळ । स्पर्श हि सकळ । जाणूं शके ॥७७॥
प्रसंग पाहोन । उचित तें जाण । करी संभाषण । तो हि पार्था ॥७८॥
घेतसे * आहार । त्यजावें तें गाळी । सुखें झोंपे वेळीं । निद्रेचिया ॥७९॥
दिसे हिंडतांना । [२] इच्छावशें तो हि । करी सर्व कांहीं । ऐसीं कर्मे ॥८०॥
देखें आतां सांगूं । कायसें एकैक । श्वासोच्छ्वासादिक । आणिक हि ॥८१॥
उघडावे नेत्र । मिटोनियां घ्यावे । सर्व हि करावें । तेणें ऐसें ॥८२॥
तरी * स्वानुभूति । लाभली म्हणोन । नुरे कर्तेपण । तयाठायीं ॥८३॥
भ्रांति-शेजेवरी । [३] सुप्त होता जेव्हां । भुलला तो तेव्हां । स्वप्नसुखें ॥८४॥
ज्ञानोदयीं मग । येतां जागृतीस । मावळे आभास । स्वप्नांतील ॥८५॥

ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः ।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ॥१०॥

आतां आत्मसंगें । सर्वेंद्रिय-वृत्ति । वावरती [४] अर्थीं । आपुलाल्या ॥८६॥
दीपाधारें जैसे । गृहींचे व्यापार । चालती साचार । धनुर्धरा ॥८७॥
तैसीं सर्व कर्मे । तयाचिया देहीं । होवोनि जो राही । योगयुक्त ॥८८॥
जैसें [५] पद्म-पत्र । असोनि जळांत । जळें नव्हे लिप्त । कदा काळीं ॥८९॥
तैसा सर्व कर्मे । करोनि तो पार्था । पावे ना सर्वथा । कर्मबंधा ॥९०॥

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि ।
योगिनः कर्म कुर्वन्ति सङ्गं त्यक्त्वाऽऽत्मशुद्धये ॥११॥

जयाची चाहूल । लागे ना बुद्धीतें । अंकुरे ना जेथें । मनोधर्म ॥९१॥
ऐशा कर्मालागीं । अर्जुना साचार । 'शारीर' व्यापार । हेंचि नांव ॥९२॥
करोनियां सोपे । सांगेन हे बोल । जैसी हालचाल । बालकाची ॥९३॥
योगीजन तैसीं । कर्मे तीं सकळ । करिती केवळ । 'शारीर' जीं ॥९४॥

---

१ ओघानें वांट्यास आलेलें.   २ इच्छा होईल तेव्हां.   ३ झोपलेला.   ४ विषयांत.   ५ कमळाचें पान.

* पंचभूतात्मक । झोंपतां शरीर । मनाचे व्यापार । स्वप्नीं जैसे ॥९५॥
वासनेचा कैसा । पसारा हा पाहें । नवल हें नोहे । काय पार्था ॥९६॥
देहालागीं होवों । न देतां जागृत । कैसी भोगवीत । सुखदु:खें ॥९७॥
इंद्रियांसी नाहीं । जयाची वार्ता हि । व्यापार तो पाहीं । 'मानसिक' ॥९८॥
ऐसा जो केवळ । 'मानस' व्यापार । करिती साचार । तो हि योगी ॥९९॥
परी कर्में बद्ध । न होती ते पाहीं । अहंभाव नाहीं । म्हणोनियां ॥१००॥
होतां भूतबाधा । भ्रमोनियां चित्त । मग तो भ्रमिष्ट । वागे जैसा ॥१०१॥
इंद्रिय-व्यापारीं । नसे कांहीं ताळ । सर्व हि अमेळ । क्रिया होती ॥१०२॥
रूप तरी देखे । आळविलें ऐके । शब्द बोले मुखें । [१] नेणिवेंत ॥१०३॥
ऐसें काजेंवीण । करी जें सकळ । कर्म तें केवळ । 'इंद्रियांचें' ॥१०४॥
सर्वत्र जाणीव । ठेवोनि जें होतें । साच बुद्धीचें तें । कर्म जाण ॥१०५॥
बुद्धीचें नेतृत्व । स्वीकारोनि चांग । वावरती मग । दक्षतेनें ॥१०६॥
परी ते नैष्कर्म्य-। स्थितीतें हि पूर्ण । गेले ओलांडून । धनुर्धरा ॥१०७॥
बुद्धीपासोनियां । शरीरापर्यंत । अहंतेची मात । नाहीं तेथें ॥१०८॥
म्हणोनि ते कर्मीं । वर्ततां हि जाण । शुद्ध होती पूर्ण । स्वभावें चि ॥१०९॥
[२] कर्तृत्वाहंकार । गाळोनियां जें जें । स्वभावें निपजे । कर्मजात ॥११०॥
तें चि तें नैष्कर्म्य । ऐसी ही [३] पावन । * गुरुगम्य खूण । जाणती ते ॥१११॥
आतां * शांतरस । भरोनि सर्वत्र । सांडोनियां पात्र । वाहूं लागे ॥११२॥
कीं जें नये बोलें । दावितां बोलोन । तयाचें व्याख्यान । झालें येथ ॥११३॥
इंद्रियांचा [४] पांग । चांग झाला दूर । श्रवणाधिकार । तयांसी च ॥११४॥
असो पुरे आतां । नको बोलूं फार । सोडोनि साचार । कथाभाग ॥११५॥
श्लोकसंगतींत । येईल [५] व्यत्यय । म्हणोनि विषय । नको दुजा ॥११६॥
आकळाया जें का । येई ना मनासी । शोधितां बुद्धीसी । सांपडे ना ॥११७॥
बोलीं बोललासी । तें चि तूं सकळ । दैव अनुकूल । म्हणोनियां ॥११८॥
स्वभावें सर्वथा । जें का शब्दातीत । तें चि होय प्राप्त । बोलांमाजीं ॥११९॥

---

१ न कळतां. २ मीं केलें अशी भावना. ३ पवित्र. ४ ताबेदारी. ५ अडथळा.

तरी आणिकांचें । काय 'प्रयोजन' । गीतार्थ-व्याख्यान । करीं आतां ॥१२०॥
श्रोत्यांची ही ऐसी । जाणोनि उत्कंठा । म्हणे दास आतां । निवृत्तीचा ॥१२१॥
श्रीहरी-पार्थाचा । संवाद गहन । तो चि सावधान । ऐका पुढें ॥१२२॥
मग पार्थालागीं । बोले जनार्दन । अर्जुना होवोन । [२]दत्तचित्त ॥१२३॥
ऐक आतां साच । योग्याचें लक्षण । तुज निवेदीन । संपूर्णत्वें ॥१२४॥

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ॥१२॥

तरी आत्मज्ञानें । होवोनि संपन्न । गेला जो विटोन । कर्म-फळा ॥१२५॥
जगामाजीं शांति । तयासी साचार । [३]रिघोनियां [३]घर । माळ घाली ॥१२६॥
परी प्रापंचिक । लोक जे आणिक । तयांसी बंधक । होती कर्में ॥१२७॥
तेणें कर्म-बंधें । मग बळकट । बसोनियां गांठ । कामनेची ॥१२८॥
तेथें फळभोग-। खुंट्यालागीं जाण । राहिले खिळोन । संसारी ते ॥१२९॥

सर्वकर्माणि मनसा संन्यस्याऽऽस्ते सुखं वशी ।
नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥१३॥

[४]सकाम तो चित्तीं । ठेवोनि आसक्ति । कर्में जैशा रीती । करी येथें ॥१३०॥
तैसा योगी तो हि । करी कर्में सर्व । परी नसे भाव । कर्तृत्वाचा ॥१३१॥
म्हणोनि तो पार्था । स्वभावें चि जाण । राहे उदासीन । कर्म-फलीं ॥१३२॥
मग जेथें पाहे । तेथें सुख कोंदे । म्हणे तेथें नांदे । महा-बोध ॥१३३॥
फलत्यागी योगी । दिसे देहवंत । *नवद्वार-युक्त । देहीं वर्ते ॥१३४॥
परी असोनि हि । नसे चि तो देहीं । करोनि हि कांहीं । करी ना तो ॥१३५॥

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ।
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥१४॥

जैसा सर्वेश्वर । अकर्ता साचार । परी चराचर । तो चि रची ॥१३६॥
आणि कर्ता ऐसें । म्हणावें तयासी । तरी तो [५]सर्वांशीं । अलिप्त चि ॥१३७॥
कीं तो सर्व कर्मीं । सर्वांगें संपूर्ण । राहे उदासीन । यथार्थत्वें ॥१३८॥

---

१ जरुरी. २ दिलें आहे लक्ष ज्यानें असा. ३ घरांत जाऊन. ४ फलार्थी. ५ पूर्णपणें.

[१] विघडेना घडी । अकर्तेपणाची । मोडे ना तयाची । * योगनिद्रा ॥१३९॥
परी पंचमहा–। भूतात्मक सारा । उभारी पसारा । स्वभावें तो ॥१४०॥
जगाचिया जीवीं । असोनियां नाहीं । कोणाचा केव्हांहि । धनंजया ॥१४१॥
स्वभावतां जग । होत जात पाहीं । तयासी वार्ता हि । नसे त्याची ॥१४२॥

नाऽऽदत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ।
अज्ञानेनाऽऽवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ॥१५॥

पापपुण्यें सारीं । असोनि समीप । तयांचें स्वरूप । देखे ना तो ॥१४३॥
तयांचें साक्षित्व । तें हि तया नाहीं । आणिक तें काई । बोलूं आतां ॥१४४॥
आकाराच्या [२] मेळें । होवोनि साकार । खेळे तो साचार । सर्वेश्वर ॥१४५॥
परी त्या प्रभूचें । निराकारपण । होई ना मलिन । कदा काळीं ॥१४६॥
तो चि [३] सृजी पाळी । आणिक संहारी । ऐसें चराचरीं । बोलती जें ॥१४७॥
तें तों सर्वथैव । केवळ अज्ञान । तत्त्वत्तां तूं जाण । धनुर्धरा ॥१४८॥

ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः ।
तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥१६॥

तुटे तें अज्ञान । समूळ ज्या वेळीं । भ्रांतीची काजळी । फिटे तेव्हां ॥१४९॥
नष्ट होतां भ्रांति । मग ईश्वराचें । [४] अकर्तृत्व साचें । प्रकटतें ॥१५०॥
ऐशापरी एक । ईश्वर अकर्ता । ऐसें जरी चित्ता । मानवलें ॥१५१॥
तरी तो च मी । हें स्वभावतां साच । सर्वथा आधींच । आहे सिद्ध ॥१५२॥
ऐसा हा विवेक । प्रकटतां चित्तीं । तया [५] त्रिजगतीं । भेद कैंचा ?॥१५३॥
स्वानुभवें मग । तयालागीं पाहें । सारें विश्व चि हें । मुक्त दिसे ॥१५४॥
पूर्व दिशेचिया । मंदिरांत भली । होतां चि दिवाळी । सूर्योदयें ॥१५५॥
सर्व हि दिशांचा । अंधार तत्काळ । सहजें सकळ । दूर होय ॥१५६॥

तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः ।
गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकलमषाः ॥१७॥

तैसें सत्य ज्ञान । व्यापक तें भलें । धुंडाळीत आलें । जयांलागीं ॥१५७॥

---

१ मोडत नाही. २ संगतीनें. ३ निर्माण करतो. ४ अकर्तेपण. ५ तिन्ही लोकांत. * परिशिष्ट पहा.

किती तयांची ती । वर्णूं समदृष्टी । सांग पां किरीटी । विशेषत्वें ॥१५८॥
आपुलें स्वरूप । ब्रह्मरूप जैसें । देखती ते तैसें । विश्वाचें हि ॥१५९॥
दावावें बोलोन । ऐसें येथें काय । असे गा आश्चर्य । धनंजया ॥१६०॥
कौतुकें हि भाग्य । न देखे दैन्यातें । विवेक भ्रांतीतें । नेणे जैसा ॥१६१॥
किंवा जैसा सूर्य । न देखे स्वप्नींहि । [1]वानगी ती पाहीं । अंधाराची ॥१६२॥
ना तरी अमृत । आपुलिया कानीं । मृत्यूची कहाणी । आइके ना ॥१६३॥
असो हें स्वभावें । [2]शीत-रश्मि जैसा । संताप तो कैसा । ओळखे ना ॥१६४॥
तैसे आत्मज्ञानी । जाहले ते पार्था । नेणती सर्वथा । [3]भूतीं भेद ॥१६५॥

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पण्डिता: समदर्शिन: ॥१८॥

मग हा [4]मशक । अथवा हा गज । किंवा हा [5]अंत्यज । ब्राह्मण कीं ॥१६६॥
[6]पैल तो परका । येथें हा आपुला । कोठून उरला । भेद ऐसा ॥१६७॥
ना तरी ही गाय । अथवा हें श्वान । एक हा लहान । एक थोर ॥१६८॥
असो हें कोठून । जागत्यासी स्वप्न । तैसा त्यासी भिन्न–। भाव नाहीं ॥१६९॥
जरी अहंभाव । तरी दिसे भेद । समूळ उच्छेद । झाला त्याचा ॥१७०॥
आतां ज्ञानियासी । चराचरीं सर्व । भिन्नत्वासी ठाव । उरे कैंचा ॥१७१॥

इहैव तैर्जित: सर्गो येषां साम्ये स्थितं मन: ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिता: ॥१९॥

म्हणोनियां नित्य । सर्वत्र जें सम । अद्वय तें ब्रह्म । आपण चि ॥१७२॥
समदृष्टीचें हें । वर्म ऐसें भलें । तया कळों आलें । संपूर्णत्वें ॥१७३॥
विषयांचा संग । न सांडितां येथें । तेविं इंद्रियांतें । न दंडितां ॥१७४॥
सर्वथा निष्काम । होवोनियां जयें । संभोगिली स्वयें । नि:संगता ॥१७५॥
लौकिक व्यापार । लोकाधारें होतां । लौकिक मूढता । [7]ओसंडिली ॥१७६॥
पिशाच्च तें जैसें । वावरोनि जनीं । दिसे ना नयनीं । लोकांचिया ॥१७७॥
तैसा तो शरीरी । तरी हि साचार । जाणे ना संसार । तयालागीं ॥१७८॥

---

१ नमुना. २ चंद्र. ३ प्राणिमात्रांत. ४ चिलट. ५ हरिजन. ६ पलीकडे. ७ दूर टाकली.

ना तरी असो हें । पवनाच्या [१] मेळें । जळीं च तें लोळे । जळ जैसें ॥१७९॥
परी तया जन । वेगळें कल्पून । तरंग म्हणोन । संबोधिती ॥१८०॥
तैसें नामरूप । तयाचें तूं जाण । एऱ्हवीं संपूर्ण । ब्रह्म चि तो ॥१८१॥
जयाचिया चित्ता । ऐसी साम्यावस्था । सर्वत्र सर्वथा । प्राप्त झाली ॥१८२॥
स्वभावें जो ऐसा । झाला समदृष्टि । म्हणे रमापति । पार्थालागीं ॥१८३॥
तया ओळखाया । एक असे खूण । [२] संक्षेपें सांगेन । ऐक आतां ॥१८४॥

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ।
स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थित: ॥२०॥

मृगजळ-पूर । लोटला अपार । तेणें गिरि-वर । [३] डंडळे ना ॥१८५॥
तैसें शुभाशुभ । पावतां साचार । राहे निर्विकार । अंतरीं जो ॥१८६॥
तो चि समदृष्टी । जाणावा तत्त्वतां । तो चि ब्रह्म पार्था । हरि म्हणे ॥१८७॥

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम् ।
स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ॥२१॥

आत्मस्वरूपातें । सांडोनियां जाण । न होय आधीन । इंद्रियांच्या ॥१८८॥
सर्वथा तो पार्था । सेवी ना विषय । नवल तें काय । असे येथें ॥१८९॥
सहजें अपार । आत्मसुखें पूर्ण । जाहलें प्रसन्न । अंतरंग ॥१९०॥
म्हणोनियां बाह्य । भोगांची प्रवृत्ति । तयाचिया चित्तीं । संभवे ना ॥१९१॥
[४] कुमुदाच्या [५] पात्रीं । भोजन स्वादिष्ट । करी जो यथेष्ट । चंद्रिकेचें ॥१९२॥
कैसा तो चकोर । रुक्ष वाळवंट । बैसेल चाटीत । आवडीनें ॥१९३॥
तैसें आत्म-सुख । आपुल्या चि ठायीं । प्राप्त झालें पाहीं । जयालागीं ॥१९४॥
तया स्वभावें चि । सुटले विषय । बोलोनियां काय । सांगावें हें ॥१९५॥
भोग-सुखें आतां । भुलविले कोण । पाहें विचारून । कौतुकें हें ॥१९६॥

ये हि संस्पर्शजा भोगा दु:खयोनय एव ते ।
आद्यन्तवन्त: कौन्तेय न तेषु रमते बुध: ॥२२॥

जैसा का भुकेला । भिकारी तो पाहीं । भक्षितो कोंडा हि । आवडीनें ॥१९७॥

---

१ वाऱ्याच्या संबंधानें. २ थोडक्यांत. ३ डळमळत नाहीं. ४ चंद्रविकासी कमळाच्या. ५ भांड्यांत.

तैसें जयालागीं । नाहीं आत्मज्ञान । रमे तो चि जाण । इंद्रियार्थीं ॥१९८॥
ना तरी तृषार्त । होवोनि हरिण । भ्रमें विसरोन । जळालागीं ॥१९९॥
मग माळरानीं । दिसे जळाभास । भुलोनि तयास । येई तेथें ॥२००॥
तैसी *स्व-सुखाची । सदा जया वाण । नाहीं आत्मज्ञान । जयालागीं ॥२०१॥
तयासी च पाहें । विषय हे पार्था । वाटती सर्वथा । सुखमय ॥२०२॥
एऱ्हवीं विषयीं । सुख धनंजया । बोलणें चि वायां । जाण ऐसें ॥२०३॥
नाहीं तरी कां गा । [1] विद्युत्प्रकाशेंच । उजाडे ना साच । जगामाजीं ॥२०४॥
जरी मेघच्छाया । पर्जन्याची धारा । ऊन आणि वारा । निवारील ॥२०५॥
तरी [2] तिमाळी तीं । चुनेगच्ची घरें । व्हावीं सांग बरें । कासयासी ॥२०६॥
पाहें बचनाग । जो का विषकंद । तया जैसें गोड । म्हणावें गा ॥२०७॥
तैसें भोगसुख । जरी म्हणों गोड । वायां बडबड । नेणतां ती ॥२०८॥
*भौमग्रहालागीं । बोलती 'मंगळ' । मृगजळा 'जळ' संबोधिती ॥२०९॥
भोग-सुखालागीं । तैसें जाण [3] वायां । 'सुख' म्हणोनियां । नांव देणें ॥२१०॥
सांगें सर्पाचिया । फणीची साउली । शीतल [4] केतुली । [5] मूषकासी ॥२११॥
जोंवरी तो मासा । आमिषाचा घांस । लावी ना मुखास । धनंजया ॥२१२॥
तोंवरी च घांस । म्हणावा तो चांग । विषयांचा संग । तैसा जाण ॥२१३॥
असोत हे बोल । विषय सकळ । पाहें दुःखमूळ । निःसंदेह ॥२१४॥
*पंडुरोगीं जैसी । अंगा येई पुष्टी । घातक ती खोटी । सर्वथैव ॥२१५॥
विषय हे तैसे । पाहतां किरीटी । विरक्त जाणती । दुःखरूप ॥२१६॥
म्हणोनियां जें का । विषयांचें सुख । साद्यन्त तें दुःख । जाण बापा ॥२१७॥
परी जे अज्ञान । तयांलागीं जाण । भोगसुखाविण । करमे ना ॥२१८॥
विषयांचें वर्म । नेणती बापुडे । सेवणें तें घडे । अत्यादरें ॥२१९॥
[6] पूय-पंकांतील । कीटकांलागोन । वाटते का घाण । पंकाची त्या ॥२२०॥
तयां दुःखितांसी । दुःख चि जीवन । सुखाचें साधन । तें चि त्यांचें ॥२२१॥
भोग-पंकांतील । जणू ते बेडूक । सुखावती देख । विषयीं च ॥२२२॥

---

१ विजेच्या चमकण्यानें. २ तिमजली. ३ व्यर्थ. ४ कितीशी. ५ उंदराला. ६ पुवांतील.

जळचरें तीं कीं । भोगजळांतील । केविं सांडितील । भोगांलागीं ॥२२३॥
आणि जीवमात्र । विषयांच्या ठायीं । उदासीन राही । जरी येथें ॥२२४॥
तरी त्या सकळ । दु:खयोनी मग । न होती का सांग । [1] निरर्थक ! ॥२२५॥
जन्म-मरणाचे । अपार सायास । आणि गर्भवास । कष्टप्रद ॥२२६॥
बिकट हा पंथ । [2] अविश्रांतपणें । घडेल चालणें । कैसें कोणा ॥२२७॥
भोगापासोनियां । भोगासक्त जीवें । जरी [3] निवर्तावें । सर्वथैव ॥२२८॥
तरी धनंजया । महादोषीं मग । कोठें जावें सांग । रहावया ! ॥२२९॥
आणिक *संसार । ऐसा शब्द जो का । नव्हेल [4] लटिका । जगामाजीं ? ॥२३०॥
भोग-दु:खांसीच । मानोनियां सुख । स्वीकारिले देख । भोग ज्यांनीं ॥२३१॥
त्यांनीं *अविद्या जी । वस्तुत: नाहीं च । करोनि ती साच । दाखविली ॥२३२॥
ह्या चि लागीं पार्था । विषय हे दुष्ट । चुकोनि ही वाट । धरिसील ॥२३३॥
तरी नको धरूं । मार्ग हा साचार । करोनि विचार । पाहें वीरा ॥२३४॥
विरक्त पुरुष । विषयांतें विष । मानोनि नि:शेष । अव्हेरिती ॥२३५॥
तयां निरिच्छांसी । सुखरूपी दु:ख । दाखविलें देख । नावडे तें ॥२३६॥

शक्नोतीहैव य: सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् ।
कामक्रोधोद्भवं वेगं स युक्त: स सुखी नर: ॥२३॥

असोनियां देही । जयांनीं संपूर्ण । ठेविले स्वाधीन । देह-भाव ॥२३७॥
तयां ज्ञानियांच्या । ठायीं पाहें पार्था । नाहीं गंधवार्ता । विषयांची ॥२३८॥
विषयांची भाषा । नेणे तयांलागीं । नांदे अंतरंगीं । ब्रह्मसुख ॥२३९॥
परी तें वेगळें । राहोनि भोगावें । [5] विहंगें चुंबावें । फळ जैसें ॥२४०॥
तैसें नव्हे, तेथें । भोग्य भोक्ता भोग । *त्रिपुटी ही [6] साङ्ग । विसरावी ॥२४१॥
ब्रह्मसुख-भोग । घेतां ऐसी एक । तेथें वृत्ति देख । उद्भवे ती ॥२४२॥
कीं जी अहंतेचा । पदर तो लोटी । दृढ मारी मिठी । सुखालागीं ॥२४३॥
दृढ आलिंगन । ऐसें घडे जेव्हां । होय ऐक्य तेव्हां । आपोआप ॥२४४॥
मग अभिन्नत्वें । जळीं जळ राहे । तैसी स्थिति आहे । सुखरूप ॥२४५॥

---

१ अर्थशून्य; वायफळ. २ एकसारखें. ३ मागें फिरावें. ४ खोटा. ५ पक्ष्यानें. ६ पूर्णपणे.
* परिशिष्ट पहा.

किंवा आकाशीं तो । वायु होतां लीन । तेथें लोपे पूर्ण । द्वैत-बोली ॥२४६॥
उरे तैसें येथें । संभोगावस्थेंत । सुख चि अद्वैत–। स्वरूपें तें ॥२४७॥
लोपतां तें ऐसें । नांव हि द्वैताचें । ऐक्य होय साचें । म्हणों जरी ॥२४८॥
तरी ऐक्य झालें । ऐसें जाणावया । अर्जुना त्या ठायां । साक्षी कोण ॥२४९॥

योऽन्त: सुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव य: ।
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥२४॥
लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषय: क्षीणकल्मषा: ।
छिन्नद्वैधा यतात्मान: सर्वभूतहिते रता: ॥२५॥

म्हणोनि हें सर्व । असो शब्दातीत । काय शब्दें येथ । वर्णावें तें ॥२५०॥
स्वभावें ही खूण । पावतील ते च । जे का होती साच । ब्रह्मनिष्ठ ॥२५१॥
ऐशा ब्रह्मसुखें । संपन्न होवोन । स्व-रूपीं आपण । रंगले जे ॥२५२॥
मानितों मी तयां । परिपूर्ण साचे । ब्रह्मैक्यभावाचे । पुतळे चि ॥२५३॥
सुखाचे अंकुर । किंवा आनंदाची । [१] प्रतिमा ते साची । तंतोतंत ॥२५४॥
नातरी ते देखा । महा-बोधालागीं । स्थान झाले जगीं । निवासाचें ॥२५५॥
परब्रह्माचे ते । मानावे स्वभाव । किंवा होती गांव । विवेकाचे ॥२५६॥
ब्रह्मविद्येचे ते । तैसे सर्वथैव । होती अवयव । [२] अलंकृत ॥२५७॥
नातरी सत्त्वाचे । सात्त्विक ते संत । किंवा मूर्तिमंत । चैतन्य ते ॥२५८॥
असो हें एकैक । वर्णितां अपार । म्हणोनि विस्तार । पुरे आतां ॥२५९॥
संत-स्तुतिमाजीं । होतां चि तल्लीन । जासी विसरोन । कथाभाग ॥२६०॥
निर्गुण बह्माचें । रसाळ वर्णन । स्व-रूपीं रंगून । करिसी तूं ॥२६१॥
परी तो [३] रसौघ । आवरीं आणिक । उजळीं दीपक । गीतार्थाचा ॥२६२॥
संत-अंतरंग–। मंदिरीं [४] मंगल । करीं [४] उष:काल । ज्ञानदेवा ॥२६३॥
श्रीगुरुनाथांचा । ऐसा हा आदेश । ऐकोनियां दास । निवृत्तीचा ॥२६४॥
मग म्हणे आतां । बोलिला श्रीकांत । तें चि ऐका चित्त । देवोनियां ॥२६५॥
आत्मसुखडोहीं । घेवोनियां उडी । मारोनियां बुडी । राहिले जे ॥२६६॥

---

१ मूर्ति.  २ सुशोभित.  ३ (काव्य) रसाचा ओघ.  ४ (ज्ञानाची) सुप्रभात.

स्थिरावोनि ते हि । तेथें चि तद्रूप । होती आपोआप । धनंजया ॥२६७॥
शुद्ध आत्मज्ञान । होतां चि जो सर्व । देखतसे विश्व । स्व-रूपीं च ॥२६८॥
तया असो पार्था । रूप आणि नाम । [१] सदेह तो ब्रह्म । मानूं आम्हीं ॥२६९॥
वस्तुत: अत्यंत । जें का असे श्रेष्ठ । मर्यादा-रहित । अविनाशी ॥२७०॥
आणि सर्वथा जे । निरिच्छ संसारीं । होती अधिकारी । ग्रामाचे ज्या ॥२७१॥
महर्षींसाठींच । राखोनि ठेविलें । वांट्यासी जें आलें । विरक्तांच्या ॥२७२॥
आणि जे का झाले । [२] संदेह-रहित । तयांसी जें होत । फलद्रूप ॥२७३॥

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।
अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥२६॥

विषयांपासोन । [३] हिरोनि आपण । जयांनीं स्वाधीन । केलें चित्त ॥२७४॥
निश्चयें ते पार्था । जेथें झाले लीन । न येती फिरोन । [४] वृत्तीवरी ॥२७५॥
आत्मज्ञानी ज्यातें । राहिले लक्षून । ऐसें जें निर्वाण । परब्रह्म ॥२७६॥
तें चि ते पुरुष । होती मूर्तिमंत । जे का ब्रह्मनिष्ठ । पंडुसुता ॥२७७॥
पार्था कैशा रीती । ते हे ऐसे झाले । देहीं चि जे आले । ब्रह्मत्वासी ॥२७८॥
पुससी हें आम्हां । तरी तें संक्षिप्त । भले तुज येथ । सांगूं आतां ॥२७९॥

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवो: ।
प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ॥२७॥
यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायण: ।
विगतेच्छाभयक्रोधो य: सदा मुक्त एव स: ॥२८॥

तरी वैराग्याचा । घेवोनि आधार । विषय बाहेर । घालविले ॥२८०॥
जयांनीं एकाग्र । केल्या मनोवृत्ति । शरीरीं जे होती । अंतर्मुख ॥२८१॥
एक *इडा नाडी । दुजी ती *पिङ्गला । *सुषुम्ना मंगला । तिसरी ती ॥२८२॥
भुवयांचीं अग्रें । होती एकत्रित । जेथें घडे भेट । तिहींची ह्या ॥२८३॥
तेथें *उफराटी । दृष्टि वळवोनि । सुस्थिर राखोनि । *नासिकाग्रीं ॥२८४॥
सांडोनियां इडा । पिङ्गला ह्या दोन । सम प्राणापान । करोनियां ॥२८५॥

---

१ देहासकट. २ संशय फिटलेले. ३ (बाजूला) ओढून. ४ इंद्रियांच्या स्वभावावर.

सुषम्नेच्या द्वारा । चित्तालागीं जाण । ठेविती नेवोन । * चिदाकाशीं ॥२८६॥
मग जैसी गंगा । ओहोळांचें पाणी । पोटीं सामावोनि । सकळ हि ॥२८७॥
भेटतां सिंधूसी । मग नये देख । वेगळें एकैक । निवडितां ॥२८८॥
तैसें जिये वेळीं । [१] प्रभंजनें होय । पार्था मनोलय । चिदाकाशीं ॥२८९॥
तदा तेथें नाना । वासना-विचार । थांबतो साचार । आपोआप ॥२९०॥
संसाराचें चित्र । उमटतें जेथें । पट चि तो फाटे । मनोरूप ॥२९१॥
जैसें सरोवर । आटोनियां जातां । दिसे ना शोधितां । प्रतिबिंब ॥२९२॥
तैसें मनपण । मनाचें सकळ । लोपतां समूळ । धनंजया ॥२९३॥
मग तेथें कोठें । अहंभावादिक । विकार ते देख । राहतील ॥२९४॥
म्हणोनियां पाहीं । असोनि हि देही । ब्रह्म चि तो होई । स्वानुभवें ॥२९५॥

८

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति ॥२९॥
इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगो नाम
पंचमोऽध्याय: ॥५॥

मन-पवनाची । क्रमोनियां वाट । आले [२] व्योमीं नीट । म्हणोनियां ॥२९६॥
पार्था ते देहींच । ब्रह्मत्व पावले । ऐसें सांगितलें । मागें तुज ॥२९७॥
यम-नियमांचे । [३] दुर्घट डोंगर । निधीरें सत्वर । ओलांडोनि ॥२९८॥
तेविं अभ्यासाचे । क्रमोनि सागर । पार्था [४] पैलपार । [४] पातले ते ॥२९९॥
घेतलें तयांनीं । प्रपंचाचें माप । करोनि निर्लेप । आपणांसी ॥३००॥
मग परब्रह्म-। स्वरूप जें साच । होवोनियां तें च । राहिले ते ॥३०१॥
योगमार्गाचा हा । सारांशें उद्देश । बोले हृषीकेश । पार्थालागीं ॥३०२॥
तेव्हां चि तो भला । [५] मर्मज्ञ कौन्तेय । पावला विस्मय । अंतरांत ॥३०३॥
जाणोनि तें कृष्णें । पार्थ-मनोगत । मग तो सस्मित । काय बोले ॥३०४॥
म्हणे पार्था येथें । ऐकोनि ही मात । काय तुझें चित्त । आनंदलें ॥३०५॥

---

१ वायूच्या द्वारा. २ आकाशांत. ३ कठिण. ४ परतीराला पोंचलें. ५ मुद्दा जाणणारा.

तंव तो अर्जुन । म्हणे देवा भला । माझा ओळखिला । मनोभाव ।।३०६।।
तुम्ही परचित्त । जाणत्यांचे राजे । आधीं चि सहजें । जाणतसां ।।३०७।।
करोनि विचार । पुसावें जें कांहीं । तें चि तुम्हीं पाहीं । ओळखिलें ।।३०८।।
तरी आतां जें का । बोलिलें संक्षिप्त । विवरोनि स्पष्ट । सांगावें तें ।।३०९।।
खोल पाण्यांतून । दुर्घट पोहणें । पाय-उतारानें । जाणें सोपें ।।३१०।।
* ज्ञान-मार्गाहून । तैसा सोपा भला । तुम्हीं दर्शविला । * योग-मार्ग ।।३११।।
आम्हां दुर्बळांसी । येथें लागे वेळ । तरी तें येईल । सुखें साहों ।।३१२।।
म्हणोनियां आतां । एकवेळ देवा । [१] पडताळा घ्यावा । तयाचा चि ।।३१३।।
विस्तरेल तरी । विवरोनि येथ । सांगावा साद्यन्त । मजप्रति ।।३१४।।
मग योगेश्वर । बोलती गा पार्था । मार्ग हा सर्वथा । आवडला ।।३१५।।
तरी सांगावया । न वेंचे गा कांहीं । सुखें बोलों, देईं । अवधान ।।३१६।।
उत्कंठेनें घेसी । ऐकोनियां चांग । आणि जरी मग । आचरिसी ।।३१७।।
तरी सांगितल्या-। वीण कैसे राहूं । मागें पुढें पाहूं । काय येथें ।।३१८।।
श्रीहरी आधींच । कृपाळु अत्यंत । त्यांत भेटे भक्त । आवडता ।।३१९।।
मग प्रेमभाव । [२] बहरतां त्याची । अद्‌भुतता साची । कोण जाणे ।।३२०।।
कृपादृष्टीचें त्या । किती कैसें कोण । करील वर्णन । यथार्थत्वें ।।३२१।।
कारुण्य-रसाची । वृष्टी च ती साची । सृष्टी च स्नेहाची । [३] अभिनव ।।३२२।।
किंवा अमृताची । म्हणों ती [४] ओतली । पिवोनि मातली । पार्थ-प्रेम ।।३२३।।
मग तया प्रेमीं । राहिली गुंतोन । म्हणोनि तेथोन । निघूं नेणे ।।३२४।।
असो बडबड । करावी ही किती । कथेची संगति । सोडोनियां ।।३२५।।
कृष्णार्जुन-प्रेम । वर्णाया यथार्थ । वाचा असमर्थ । सर्वथा ती ।।३२६।।
नेणे चि जो माप । आपुलें आपण । ईश्वरा त्या कोण । कैसा जाणे ।।३२७।।
म्हणोनि तें प्रेम । साच शब्दातीत । विस्मय तो येथ । काय असे ।।३२८।।
पूर्व-अभिप्राय । पाहोनियां गमे । देव पार्थ-प्रेमें । [५] मुग्ध झाला ।।३२९।।
कीं तो बलात्कारें । म्हणे बापा पार्था । ऐक जें जें आतां । सांगेन मी ।।३३०।।

---

* परिशिष्ट पहा. १ अनुवाद करावा. २ उसळून आल्यावर. ३ अपूर्व. ४ घडविली. ५ मोहित.

[1] बोधे तुझें चित्त । प्रकारें ज्या जैसें । कौतुकें तें तैसें । निवेदीन ॥३३१॥
तरी कवणातें । नांव देती योग । काय उपयोग । तयाचा तो ॥३३२॥
किंवा आचराया । कोणा अधिकार । सर्वथा साचार । असे येथें ॥३३३॥
ऐसें जें जें कांहीं । असे येथें [2] उक्त । सांगेन समस्त । तें तें आतां ॥३३४॥
तरी सावधान । ऐक सविस्तर । बोले योगेश्वर । पार्थालागीं ॥३३५॥
[3] पार्थ-सख्यत्वाचा । न होतां [4] वियोग । सांगेल जो योग । हृषीकेश । ३३६॥
तो चि भाग पुढें । स्पष्ट करूं साचा । दास निवृत्तीचा । म्हणे ऐसें ॥३३७॥

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी
पंचमोऽध्याय: ।
हरये नम: । हरये नम: । हरये नम: ।
श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

१ तुझी समज पडेल. २ बोललेलें. ३ अर्जुनाच्या स्नेहाचा (प्रेमाचा). ४ ताटातूट.